# मोडी लिपी

## ( प्राथमिक )

### प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**जानेवारी २०१८ पासून एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाचा मराठी विभाग आणि मोडी लिपी संवर्धन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मोडी लिपीचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु होत आहे. प्रवेश सुरु आहेत.**

महाराष्ट्राच्या इतिहासात मोडी लिपीचे महत्त्व मोठे आहे यात शंका नाही महाराष्ट्राच्या राजकीय आणि सांस्कृतिक वाटचालीचा मोठा दस्तऐवज मोडी लिपीत संग्रहित असून महाराष्ट्र सरकारच्या पुरातत्व खात्यात असंख्य मोडी कागदपत्रे आहेत. मध्ययुगीन काळात मोडी ही व्यवहाराची लिपी असल्याने अनेक महत्त्वाची कागदपत्रे या लिपीत लिहिलेली आहेत. दुर्दैवाने आज मोडी वाचता येणाऱ्या व्यक्ती दुर्लभ झाल्या आहेत. त्यामुळे ही कागदपत्रे वाचून त्यांचा अन्वयार्थ लावणे अवघड बनले आहे. हे लक्षात घेऊन मराठी विभागाने मोडी लिपी संवर्धन संस्थेच्या सहकार्याने मोडी लिपीचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याचे ठरविले आहे. या अभ्यासाने अभ्यासकांसाठी संशोधनाचे मोठे दालन खुले होईलच. तसेच व्यवसायाच्या संधीही वाढतील.

**कालावधी - वीस तास ( दहा आठवडे )**

**शुल्क - रु. १५००/ - फक्त ( प्रशिक्षण, अभ्यास सामग्री व संदर्भ पुस्तिका समाविष्ट )**

**स्थळ - एस एन डी टी महिला विद्यापीठ, चर्चगेट**

**वेळ - विद्यार्थिनींच्या सोयीनुसार ठरवण्यात येईल.**

**अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र दिले जाईल.**

**इच्छुक व्यक्तींनी त्वरित संपर्क साधावा -**

**एस एन डी टी म विद्यापीठ - ०२२ - २२०३१८७९ मराठी विभाग - १२३१ / १३०४**

**डॉ. अरुणा दुभाषी - ९८६९३९७२९४ / ८८७९५३४७५३**

**प्रा. राजश्री पाटील - ९००४२००४८७**